जागतिक महिला दिन विशेषांक 2025

# महाईन्यूज™

विधात्याच्या
नवनिर्माणाची कलाकृती तू
एक दिवस साजरा कर
स्वतःच्या अस्तित्त्वाचा तू
जागतिक महिला दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 8 मार्च 2025 | mahaenews.com

## विशेष संपादकीय



भावसंवाद
सुनील आढाव
मुख्य कार्यकारी संपादक,
महाईन्यूज

# नारी शक्ती चा उत्सव... म्हणजेच जागतिक महिला दिन

जागतिक महिला दिन हा दर वर्षी ८ मार्च ला साजरा केला जातो. महिलांचा सन्मान आणि तिचे स्त्रीत्व साजरे करण्यासाठी हा दिन जगभरात साजरा केला जातो. महिलांचा फक्त एक दिवस सन्मान करणे, एवढेच या दिनाचे महत्व नाही.तर महिलांचा संघर्ष किंवा त्यांच्या कामगिरीला या दिवशी सलाम करणे पुरेशे नाही, तर त्यांच्या कडून शिकता येतील अश्या मौल्यवान गोष्टी आत्मसात करणे देखील तेवढेच महत्वाचे आहे. आपल्या कर्तृत्व आणि चिकाटीच्या जोरावर महिलांनी सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेतल्याचे आपण सारे अनुभवत आहोत. महिलांमध्ये अपार शक्ती आणि क्षमता आहेत. व्यवहारी जगात त्यांनी सगळ्याच क्षेत्रात आपली कीर्ती स्थापित केली आहे. आपल्या अद्भुत साहस, अथक परिश्रम तसेच दूरदर्शी बुद्धिमत्तेच्या जोरावर विश्वपटला वर स्व: त ची वेगळी ओळख निर्माण करण्यात ती यशस्वी झाली आहे. मानसिक संवेदना, करुणा, वात्सल्य अशा भाव भावनांनी परिपूर्ण असलेल्या अनेक स्त्रियांनी जग निर्माण करण्यात आपले मोलाचे योगदान दिले आहे. अश्या या स्त्रियांचे व्यक्तिमत्व तसेच त्यांच्या कर्तृत्वाची संक्षिप्त ओळख करून देण्याचा प्रयत्न महिला दिना निमित्त महाईन्यूजने केला आहे...

आजचा दिवस जितका महिलांसाठी खास आहे, तितकाच तो संपूर्ण मानव समाजासाठीही खास आहे. कारण स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदर करायला हवा. त्यामुळे आपण आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजेत, कारण त्या नसत्या तर आपले जीवन अपूर्ण राहिले असते!

म्हणतात ना, प्रत्येक पुरुषाच्या यशामागे एका स्त्रीचा हात असतो, आणि ही गोष्ट खरीच आहे. आई, बहीण, पत्नी, मैत्रीण किंवा सहकारी—स्त्री आपल्या विविध भूमिकांतून आपल्या आयुष्याला दिशा देते, पाठिंबा देते. पूर्वीच्या काळी स्त्रियांना केवळ 'चूल आणि मूल' या मर्यादेत पाहिले जात असे. मात्र, आजच्या काळात स्त्रिया कुटुंब सांभाळण्यासोबतच शिक्षण, व्यवसाय, संशोधन, प्रशासन अशा सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. त्या केवळ घराचे घरपण जपत नाहीत, तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे आजचा दिवस केवळ त्यांचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याचा आहे!

"ती असेल सोबत तर जीवन आपले सुवर्ण,
ती नसेल सोबत तर जीवन आपले अपूर्ण,
तिच्यामुळेच आपल्या घराला आहे घरपण,
तिच्याविना आपले सुने सारे जीवन."

खरचं! घरात एकही स्त्री नसेल तर आपले आयुष्य नरक बनून जाते. आपल्या घरांना आणि आयुष्याला स्वर्ग बनवण्याचे काम स्त्रिया करतात. काही स्त्रिया तर भर पहाटे उठून स्वतः स्वयंपाक करतात. सगळं काही आटपून कामाला निघतात. संध्याकाळी कष्ट करून घरी परततात आणि घरी परतून पुन्हा घरच्या किंवा इतर कामाला लागतात. त्यांचे संपूर्ण दिवस फक्त कष्टात जाते. खरचं! या स्त्रियांचे कितीही कौतुक केले तरी कमीच आहे. या स्त्रिया देवाने आपल्यासाठी पाठवलेले देवदूत आहेत. म्हणूनच तर त्यांचा मनापासून सन्मान होयला हवा.



**जागतिक महिला दिनानिमित्त हार्दिक शभेच्छा!!!**

विशेषांक-2025

महाईन्यूज ™
www.mahaenews.com

जागतिक महिला दिन

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 8 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com



# शैक्षणिक गुणवत्तेचा 'मास्टरमाईंड' प्रा. डॉ. प्रदीपा नायर

## मास्टरमाइंड स्कूलच्या यशस्वीतेची **गगनभरारी**

**एज्युकेट, एक्सप्लोर, एक्सेल हे ब्रीदवाक्य घेऊन भोसरी येथील मास्टर माईंड ग्लोबल स्कूल विद्यार्थ्यांना घडवत आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, दर्जा एखाद्या लखलखत्या ताऱ्याप्रमाणे चमकत आहे. संस्थेच्या या यशस्वी वाटचालीत महत्वपूर्ण आणि मोलाचे योगदान आहे ते शाळेच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांचे.**



विद्येचे माहेरघर म्हणून ओळख असणाऱ्या पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात मास्टर माईंड ग्लोबल सीनियर सेकंडरी स्कूलने अल्पावधीत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ही ओळख निर्माण होण्यात प्राचार्य डॉ. प्रदीपा नायर यांची महत्त्वाची भूमिका आहे.अत्यंत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. या हेतूने सन 2017 मध्ये तुकाराम गवळी यांनी मास्टर माईंड ग्लोबल इंग्लिश सीनियर सेकेंडरी स्कूलची स्थापना केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या सेक्रेटरी जयश्री गवळी यांच्या काटेकोर देखरेखेखाली, ट्रस्टी संकेत गवळी यांच्या आधुनिक नवकल्पनांच्या बळावर आणि मनिकंडन नायर यांच्या कणखर व्यवस्थापनात प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांनी या शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावला.

CBSE अभ्यासक्रम राबविणाऱ्या या शाळेत पूर्व प्राथमिक ते 12 वी इयत्तेपर्यंतच्या वर्गात 2 हजाराहून अधिक विद्यार्थी ज्ञानार्जन करतात. दिवसेंदिवस वाढत असलेली विद्यार्थ्यांची ही अफाट संख्या शाळेचा दर्जा व नावलौकिक दर्शवतो. प्रा. डॉ.प्रदिपा नायर सांगतात, आमच्या शिक्षकांच्या अथक परिश्रमातून शाळेच्या गुणवत्तेत भर पडत आहे. शाळा एक ज्ञान संवर्धनाचे केंद्र असली पाहिजे अशी आमची धारणा आहे. जिथे मुलांना शैक्षणिक सर्जनशीलता, शारीरिक तंदुरुस्ती, वैयक्तिक विकास, नैतिक मूल्ये आणि अध्यात्मिक विकास साधता आला पाहिजे. म्हणूनच पुण्यातील 10 नामांकित शाळेसाठीचे नामांकन हे मास्टरमाईंड शाळेला मिळाले आहे. शाळेने सहज सुंदर अध्यापनातून मुलांना अभ्यासक्रम शिकवणे आणि क्रीडा प्रकारातून मुलांच्या आरोग्यावर भर देणे या गोष्टींचा अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे

डॉ.प्रदीपा नायर म्हणतात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर आम्ही भर दिला आहे. म्हणूनच शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यातूनच त्यांच्या अभ्यासक्रमावर बरोबरच कौशल्य विकासात भर पडत आहे. शाळेला यामुळे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कारही प्राप्त झाल्याचे प्रा. नायर सांगतात.

### मास्टर माईंड ग्लोबल सीनियर सेकंडरी स्कूल

मधील शिक्षण वर्गाच्या चार भिंतीपलीकडे पसरले आहे. प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर या विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेत उच्च स्थानी ठेवताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली पाहिजे यासाठी विशेष प्रयत्नशील असतात. गरजुंना मदत, स्वच्छता मोहीम आणि वृक्ष लागवडीद्वारे विद्यार्थ्यांना विविध सामाजिक उपक्रमांत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी सदैव प्रोत्साहित करतात. या व्यतिरिक्त शाळेच्या माध्यमातून मोफत कॅन्सर तपासणी शिबिरे आयोजित करुन कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करून या आजाराविरुद्ध लढण्यासाठी जागृती ही केली जाते.

### लखलखते व्यक्तिमत्व

प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांना आजपर्यंत सुवर्ण लक्ष राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार आकाश इंटरनॅशनल अकादमी कडून महात्मा गांधी राष्ट्रीय पुरस्कार 2019, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम द गुरू अवॉर्ड, इंटरनॅशनल जीनियस अवॉर्ड मलेशिया, इंटरनॅशनल कलाम गोल्डन अवॉर्ड चेन्नई, ग्रेट पर्सनॅलिटी अवॉर्ड, लाजपत भवन दिल्ली. भारत सरकारद्वारे मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांना ASIAN ICOIC AWARD ने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच सन 2022 मध्ये शालेय शिक्षणात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल EDUCATION INNOVATION SUMMIT द्वारे सन्मानित करण्यात आले. कॉमनवेल्थ एक्सलन्स अवॉर्ड सर्वोत्कृष्ठ प्राचार्या म्हणून त्यांना विशेष सन्मान प्राप्त झाला आहे. 2023 मध्ये CED ॲक्रेडेशन नोएडाद्वारे मास्टर ग्लोबल सीनियर सेकंडरी स्कूल ची A ++ 5 स्टार रेटिंग स्कूल साठी निवड झाली आहे. एक्सपिरीयन्स लर्निंग स्कूल म्हणून विशेष श्रेणी मान्यता देण्यात आली.

***शैक्षणिक जगतात यशाच्या शिखरावर वाटचाल करत असलेल्या या शैक्षणिक संस्थेच्या केंद्रस्थानी डॉ. प्रदीपा नायर आहेत. त्या दूरदर्शी प्राचार्या आहे. त्यांच्या नेतृत्व गुणांमुळेच शाळेचा सर्वांगीण विकास होऊन ही शाळा शहरात आदर्शवत ठरली आहे.***


# नगरसेविका ते यशस्वी उद्योजिका !

## “जिंदगी एक इम्तिहान है, हर दिन उसको परखा जाता है - जयश्री गवळी



छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून स्वतंत्र स्वराज्य निर्माण करून देण्यासाठी केलेल्या संघर्षाचे दर्शन देणाऱ्या राजमाता जिजाऊ, मै मेरी झाशी कभी नही दूंगी असे ठमकावून इंग्रजांशी संघर्ष करणारी राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणाची महती ओळखून मुलींना स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सर्व स्त्रियांच्या कार्याला वंदन. याच कार्याला अनूसरून स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाची धुरा यशस्वी पणे सांभाळणाऱ्या रणरागिनीकडून महिला दिनानिमित्त सर्व महिलांना शुभेच्छा.!!

पायाखालची जमीन सरकली तरी आभाळातून पडणाऱ्या वीजेसोबत लढावं लागतं... तेव्हा कुठेतरी उत्कृष्ट व्यक्तिमत्व जन्माला येत...!



आणि असेच व्यक्तिमत्व म्हणजेच भोसरी येथील जयश्री गवळी. त्यांनी माजी नगरसेविका म्हणून समाज सेवेचे कार्य यशस्वीरित्या पार पाडले. त्याचप्रमाणे त्यांची ओळख एक महिला उद्योजिका अशी देखील आपणास पाहवयास मिळते.

“जिंदगी एक इम्तिहान है, हर दिन उसको परखा जाता है. जो इस जिंदगी में मेहनत करता है वह ही सफलता पाता है... जयश्री गवळी यांनी 2014 मध्ये मास्टर माईंड ग्लोबल स्कूलची स्थापना केली. शिक्षणाच्या प्रसारचे काम पुढे नेत त्यांनी 2017 मास्टर माईंड ग्लोबल सिनिअर सेकंडरी स्कूल आणि ज्यु. कॉलेजची आळंदी रोड येथे स्थापना केली. आणि याच रुजवलेल्या छोट्या रोपाचे एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरण झालेले आपणास पाहवयास मिळते.’

शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देने तसेच गरजु विध्यार्थ्यांना मदत करने अश्या प्रकारचे कार्य त्या करत आहेत. “अपने किरदार से महकता है इंसान या उक्तीप्रमाणे माझ्याबरोबर माझ्या शाळेचा, माझ्या समाजाचा, माझ्या विभागाचा सर्वांगीण विकास व्हावा. अशी जयश्री गवळी यांचे धारणा आहे. कारण स्त्री म्हणजे चूल आणि मूल या पलीकडे देखील देशाचा नेतृत्व करू शकते. जसे भारताच्या माजी राष्ट्रपती मा.प्रतिभाताई पाटील यांनी दाखवून दिले. जमिनीवरती पाय ठेवून आकाशाला भिडण्याची धमक ही कल्पना चावला यांनी अखंड जगाला दाखवून दिली. तीच परंपरा, तिच संस्कृती जोपासत, हे मी करु शकते हे पुणे शहराला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी होऊ शकते हे जयश्री गवळी यांनी मोठ्या हिमतीने दाखवून दिलेले आहे.

# बांधकाम क्षेत्रामध्ये स्वतःचा ठसा निर्माण करणाऱ्या नम्रता बन्सल



## महिलांसाठी आदर्श, पिंपरी चिंचवडमध्ये बांधकाम क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख

**बांधकाम व्यवसाय खरे तर पुरुष वर्गाची मक्तेदारी मानले जाते मात्र पिंपरी चिंचवड मध्ये की मक्तेदारी मोडून काढण्याचे काम नम्रता बन्सल यांनी केले आहे. गेल्या आठ वर्षाहून अधिक काळ रिअल इस्टेटमध्ये काम करून गुणवत्ता, सचोटी आणि प्रामाणिकपणाने काम करून बांधकाम क्षेत्रामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे . वेगळ्या वाटेवर आपल्या ठसा उमटवणाऱ्या नम्रता बन्सल या महिलांसाठी आदर्श ठरत आहेत**



नम्रता बन्सल यांना रिअल इस्टेट क्षेत्राचा ८ वर्षांहून अधिक आणि एफएमसीजीमध्ये ३ वर्षांचा अनुभव आहे. याच अनुभवाच्या जोरावर नम्रता बन्सल यांनी ऐश्वर्यम बाय एसेन येथे असोसिएट डायरेक्टर आणि चीफ सेल्स, मार्केटिंग आणि ब्रँडिंग ऑफिसर म्हणून काम पाहिले. त्यांनी ऐश्वर्यम बाय एसेनसाठी पॅन इंडिया ऑपरेशन्स, ग्रुपची व्यवसायाच्या दृष्टीने विकासात्मक वाढ याकडे प्रामुख्याने लक्ष दिले. याचीच परिनिती म्हणजे ऐश्वर्यमने गेल्या दहा वर्षात यशस्वीतेचे सर्व रेकॉर्ड मोडले आहे. यशिवाय व्यवसाय विकास, विक्री, विपणन आणि नेतृत्व या गुणांमुळे नम्रता बन्सल बांधकाम व्यवसायात यशस्वीतेचा नवा आयाम स्थापित करत आहे.

नम्रता बन्सल म्हणतात बांधकाम क्षेत्र हे गुंतागुंतीचे क्षेत्र आहे. प्रत्येक गोष्टीची सत्यता पडताळून पहावी लागते. आपल्या कामावर अनेक बाबी अवलंबून असतात. म्हणूनच काम करताना सुरुवातीपासून सचोटीने काम केले. जमिनीचा ताबा घेण्यापासून ते बांधकाम हस्तांतरणापर्यंत संपूर्ण प्रक्रिया सांभाळणे. मी यशस्वीरित्या क्रॉस-फंक्शनल टीम्सचे नेतृत्व केले आहे. याशिवाय व्यवसाय वाढीसाठी त्या दृष्टीने विकासात्मक प्रणाली आणि धोरणे तयार केली. हे काम करताना ग्राहकांना केंद्रबिंदू ठेवले. या कामातून दृष्टिकोन असा होता की ग्राहक, विक्रेते आणि कंत्राटदारांसाठी ऐश्वर्यमला पसंतीचा पर्याय देतील.

आम्ही ऐश्वर्यम बाय एसेनला रिअल इस्टेटमध्ये एक अग्रणी



प्रकल्प म्हणून पुढे नेण्यासाठी परिश्रम घेत आहोत. अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा विस्तार सुरू आहे. यामध्ये ऐश्वर्यममधील माझ्या टीमचे आणि माझ्या कुटुंबाचे त्यांच्या अटळ पाठिंब्याबद्दल आणि प्रेरणाबद्दल मी मनापासून आभारी आहे.

# स्त्री शक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर



## स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाची धुरा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या रणरागिनी!

छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून स्वतंत्र स्वराज्य निर्माण करून देण्यासाठी केलेल्या संघर्षाचे दर्शन देणाऱ्या राजमाता जिजाऊ, मै मेरी झाशी कभी नही दूंगी असे ठमकावून इंग्रजांशी संघर्ष करणारी राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणाची महती ओळखून मुलींना स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सर्व स्त्रियांच्या कार्याला वंदन. याच कार्याला अनूसरून स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाची धुरा यशस्वी पणे सांभाळणाऱ्या रणरागिनीकडून महिला दिनानिमित्त सर्व महिलांना शुभेच्छा.!!

स्त्री म्हणजे जन्मदाती,
स्त्री म्हणजे संस्कृती,
स्त्री म्हणजे नाविन्याचा वसा,
स्त्री म्हणजे घराच घरपण,
स्त्री म्हणजे महान कार्य, अशा या स्त्री शक्तीला मानाचा मुजरा.. आज सर्वत्र जगभर महिला दिन साजरा होत आहे. सर्व महिला आज हा सन्मानाचा अभिमानाचा दिवस उत्साहाने साजरा करत आहे. आज सर्वत्र कर्तृत्ववान महिलांचे, समाजात मोलाचे काम करणाऱ्या महिलांचे, गृह उद्योग चालवणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. त्यांना त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले जाते. आज भारतातील स्त्री प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर आहे. शेतीतील मजुरापासून ते देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत तसेच शिक्षिका, डॉक्टर, पोलीस निरीक्षक, तलाठी, ग्रामसेविका पायलट, खेळाडू अशा अनेक क्षेत्रात महिलांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. आपल्या भारत देशामधील अनेक महिलांनी विविध क्षेत्रात आपले नाव कमावले आहे.

तुझ्या प्रयत्नांना मिळू दे यशाची सोनेरी किनार
लक्ष लक्ष दिव्यांनी उधळू दे, तुझा संसार



यांप्रमाणेच स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाची धुरा यशस्वी पणे सांभाळणाऱ्या रणरागिणी संस्थेच्या कोषाध्यक्ष विजया भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालक कविता कडू , विश्वस्थ सरिता विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्याध्यापीका व सर्व शिक्षिका यांच्याकडून महिला दिनाच्या सगळ्यांना खूप शुभेच्छा.

**- कविता भोंगाळे,** संचालक,
गायत्री इंग्लिश स्कूल व जयुनिअर कॉलेज.

कर्तृत्व अन् सामर्थ्याची ओढून घे, नवी झालर
स्त्री शक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर !



# “तुझ्या उत्तुंग भरारी पुढे गगन ही ठेंगणे भासावे”

## सिद्धांत इंटरनॅशनल स्कूलतर्फे नारी शक्तीला मानाचा मुजरा!!







**“तुझ्या उत्तुंग भरारी पुढे**
**गगन ही ठेंगणे भासावे ,**
**तुझ्या विशाल पंखाखाली**
**विश्व ते सारे वसावे....आज जागतिक महिला दिन. म्हणजे ‘ती’चा जागर करण्याचा दिवस. अहोरात्र आपल्या कुटुंबाला, मुलाबाळांना सांभाळत असताना स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी झगडणाऱ्या त्या प्रत्येक महिलेला सिद्धांत इंटरनॅशनल स्कूलच्या परिवाराकडून मानाचा मुजरा आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.**

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी, ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी, न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला असला तरीही, सन १९१० च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार, ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला.

आज महिला सक्षम होणे खूप गरजेचे आहे.महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम बनविण्याची प्रक्रिया. यात ज्यांनी मोलाचे योगदान दिलेले महात्मा फुले, राजाराम मोहन राय , छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली, त्यांना निर्णयक्षम बनवले. आणि त्यांनी महिलांना दिलेला मानसन्मान हे विसरून चालणार नाही.

आज महिला सक्षमीकरणाची गरज ही लैंगिक समानता ,आर्थिक स्वायत्तता ,निर्णयक्षमतेत वाढ ,स्त्रीविरोधी अन्याय व हिंसाचार रोखणे यासारख्या गोष्टींसाठी आजच्या काळात खूप आवश्यक आहे.

***महिला सक्षमीकरण हा केवळ महिलांसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. जेव्हा महिला सक्षम होतात, तेव्हा समाज आणि राष्ट्र दोन्ही प्रगती करतात. त्यामुळे महिलांना सक्षम बनवण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे गरजेचे आहे. पुनश्च प्रत्येक महिलेला सिद्धांत इंटरनॅशनल स्कूल च्या परिवाराकडून मानाचा मुजरा आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.***



# ‘सेल्फ मेड वूमन’ सरिता सिंग!

## शैक्षणिक क्षेत्रासह अनेक क्षेत्रात ठसा उमटवला!

**एखादी व्यक्ती आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवते. सरिता सिंग हे असेच एक ध्येयाने भारलेले व्यक्तिमत्त्व आहे. प्रियदर्शनी स्कूल, आळंदी या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या सरिता सिंग यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच चित्रपट, लेखन, उद्योग, बालमानसशास्त्र व आर्थिक क्षेत्रातही यशस्वीपणे काम केले आहे. आपल्या शैक्षणिक संस्थेतून सर्वगुणसंपन्न आणि समाजातील विविध क्षेत्रात नेतृत्व करू शकेल, अशी भावी पिढी घडविण्याचा त्यांनी ध्यास घेतला आहे. आपल्याला मिळालेल्या सुरक्षित वातावरणात गुरफटून रहायचे नाही आणि आपली एकाग्रता कधीच ढळू द्यायची नाही हे त्यांचे ब्रीद आहे.**



सरिता सिंग या एक यशस्वी उद्योजिका, शिक्षिका व शिक्षणतज्ज्ञही आहेत. असे जर असे म्हणणे असेल की ‘एकाच वेळी आपण सर्वकाही साध्य करून शकत नाही’ तर त्यांनी सरिता सिंग यांना नक्की भेटायलाच हवे.
वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी सहायक शिक्षिका म्हणून सरिता सिंग यांनी करिअरची सुरुवात केली. त्याचवेळी त्या ‘वर्तणुकीचे मानसशास्त्र’ या विषयाचे शिक्षण घेत होत्या. सहायक शिक्षिका म्हणून काम केल्यानंतर अल्पावधितच म्हणजे केवळ पाच वर्षांत त्या संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखही झाल्या. प्रियदर्शनी संस्थेमध्ये त्यांनी पारंपरिक शिक्षण पद्धतीबरोबरच अनेक अभिनव कल्पनाही राबविल्या. शाळेच्या उभारणीसह त्यांनी समाजाची उभारणी करण्यातही मोलाचा वाटा उचलला आहे. मुलांना घडवत असताना अतिशय आवश्यक असणारे शिक्षक आणि पालकांसाठी समुपदेशनाचे उपक्रम राबविले. सर्जनशीलपणे शिकविण्याची पद्धत, अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा, खेळातून शिक्षण, करिअर मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना येणाऱ्या अडचणींबाबत त्यांच्यासाठी समुपदेशन यासारख्या अनेक कल्पना राबविल्या.



सध्याच्या काळात केवळ पुस्तकांवर आधारित शिक्षण न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन व्हावे, अशी त्यांची भूमिका आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांनी पाठ्यपुस्तकावर आधारित शिक्षणाबरोबरच क्रीडा व माहिती-तंत्रज्ञान अशा विषयांच्या मार्गदर्शनासाठी लक्ष दिले. मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांना शाळेत मार्शल आर्ट्‌सचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. एवढेच नाही तर माहिती तंत्रज्ञान या विषयाचे प्रशिक्षण सक्तीचे केले. त्यांचा हाच दृष्टिकोन त्यांच्यातील शिक्षणाची वेगळी दृष्टी दर्शवितो.

सरिता यांनी मॅकमिलन प्रकाशनाच्या सल्लागार आणि क्रिएटिव्ह हेड म्हणूनही काम केलेले आहे. न्यूयॉर्क ऑफिसमधून त्यांनी सात वर्षे मॅकमिलन प्रकाशनाच्या भारतीय विभागाचे काम करतानाच शाळेचेही कामकाज यशस्वीपणे सांभाळले. या सात वर्षांत त्यांनी संपूर्ण देशभर अनेक कार्यशाळा घेतल्या. तसेच शाळांसाठी पुस्तके तयार करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### करमणूक क्षेत्रातही उमटवला ठसा

सरिता यांनी शिक्षण क्षेत्राबरोबरच करमणूक क्षेत्रातही ठसा उमटविला. मुंबई येथील केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाच्या सल्लागार सदस्य म्हणूनही त्यांनी तीन वर्षे काम पाहिले. सहारा वन मीडिया अँड एन्टरटेन्मेंट लिमिटेड या कंपनीच्या प्रकल्पांसाठी आणि बोनी कपूर यांच्या सल्लागार म्हणून काम करण्याबाबत कपूर यांच्याकडून त्यांना विचारणा झाली होती. या क्षेत्रात सल्लागार म्हणून काम करीत असताना त्यांना चित्रपटसृष्टीचे बरेच ज्ञान मिळाले. त्याआधारे त्यांनी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या काही चित्रपटांवर अनेक लेखही लिहिले आहेत. त्यांनी अनेक निर्माते, वितरक, गुंतवणूकदार यांच्यासमवेत सल्लागार म्हणूनही काम केले आहे. त्यांनी किमान ६५ चित्रपटांच्या संहितांचे ‘स्क्रीप्ट डॉक्टर’ म्हणून काम केले आहे. मल्टिप्लेक्सची साखळी असलेल्या कार्निवल सिनेमाच्या प्रमुख म्हणूनही तीन वर्षे काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. जयहिंद महाविद्यालयाच्या लघु चित्रपट महोत्सवाच्या पंच सदस्य म्हणूनही त्यांनी दोन वर्षे काम पाहिले आहे. हे सर्व करत असताना शाळेविषयी असलेला त्यांचा समर्पण भाव कोठेही कमी झाला नाही. शाळेचा विस्तार करण्याबरोबरच शाळेला अद्ययावत करण्याकडेही त्यांचे लक्ष होते.



### ‘सेल्फ मेड वूमन’

मुंबईमधील अनेक शाळांमध्ये त्यांनी कार्यशाळा घेतल्या आहेत. तसेच गेस्ट लेक्चरर म्हणून काम केले आहे. सरिता या दर्जेदार शिक्षण आणि शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. त्यांचे स्फूर्तिदायक आणि धडाडीचे व्यक्तिमत्त्व अनेकांचे लक्ष वेधून घेते. फोर्ब्स इंडियामध्ये त्यांच्यावर प्रसिद्ध झालेल्या लेखात अडथळ्यांवर मात करणारी ‘सेल्फ मेड वूमन’ असा उल्लेख करण्यात आला होता. न्यूज एक्समध्ये त्यांनी लिहिलेल्या लेखात शिक्षण पद्धतीविषयी त्यांच्या कल्पना व्यक्त केल्या होत्या. तसेच सध्याच्या ‘कोविड १९’ मुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक व भावनिक आरोग्याविषयी उद्भवलेले विपरीत परिणाम याबाबतही त्यांनी परखड मते व्यक्त केली.
......

### इतरांसाठी प्रेरणा

आता त्या प्रियदर्शनी स्कूलच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी पूर्णवेळ काम करीत आहेत व आळंदी येथील शाळेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. प्रियदर्शनी स्कूलच्या विकासासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले असले तरी त्या मीडिया आणि करमणूक क्षेत्रातील अनेक प्रकल्पांमध्ये सहभागी होतात. सदैव परिवर्तनशील असणे, एखाद्या विशिष्ट क्षेत्रातच गुरफटून न राहता वेगवेगळ्या आघाड्यांवर स्वत:ला आजमावणे व सदैव सचोटीने वागणे या सर्वांचे त्या एक आदर्श उदाहरण आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात सरिता यांच्यासारख्या नेतृत्वाची सध्या नितांत गरज आहे. या क्षेत्रातील त्यांचा प्रभाव व योगदानामुळे भविष्यात त्यांच्यासारखेच अनेक नेतृत्व उदयास येण्यास नक्कीच मदत होईल याची खात्री वाटते. अशा ‘सेल्फ मेड वूमन’ सरिता सिंग यांचा जीवनप्रवास हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरले यात शंका नाही.

# ज्ञानदानाचा वसा घेतलेल्या सेवावृत्ती



## मोरया शिक्षण संस्थेच्या महिला शक्तीचा **गौरवशाली** प्रवास

**नेहमीच आपल्या अवतीभोवती आपण अशी काही कर्तृत्वात माणसे बघतो त्यांचे कार्य वैभव बघून डोळे दिपतात . त्यांचे वैभव, ऐश्वर्य आपणास दिसते पण त्या मागील कष्ट, यथायोग्य अविरत केलेले प्रयत्न आपणास माहीत नसतात. अनेक अडथळे छेद देऊनच ही माणसे मोठी होतात या सर्व मोठ्या माणसांच्या हाती शून्य होते. मात्र त्यांच्या अथक परिश्रमाने जिद्दीने शून्यातून विश्व निर्माण केले असेच एक व्यक्तीमत्वं म्हणजे चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेच्या संस्थापिका श्रीमती शकुंतला माटे .तर श्रीमती शकुंतला माटे यांच्या बहारदार कर्तृत्वाने भरलेला डवरलेला वटवृक्ष तेवढ्याच तडफदार नेतृत्वाने सांभाळत आहे त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून उलट प्रगत पाऊल ठेवून संस्थेला पुढे नेणारी त्यांचीच कन्या सौ.इंद्रायणी माटे पिसोळकर.**

उत्तम संस्कार, उत्तम शिक्षणासह विद्यार्थी केंद्रित उपक्रमशील शाळा अशा लौकिकाने माटे शाळेकडे पाहिले जाते.सामान्यासाठी एक उत्तम मराठी शाळा म्हणून मोरया शिक्षण संस्थेच्या विविध शाळांकडे पाहिले जाते. इंद्रायणी माटे पिसोळकर यांचा जन्म आणि संस्थेची स्थापना एकाच सालातील आहे. त्यांचे शालेय शिक्षण माटे शाळेतूनच पूर्ण झाले.त्याकाळी माटे शाळा चिंचवडमध्ये बाळसे धरत होती. त्यामुळे त्या आणि संस्था एकत्र मोठ्या झाल्या. लहानापासूनच संस्थेची त्यांची नाळ जोडली गेली पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी पुणे गाठले. 1992 मध्ये एसपी कॉलेजमधून त्यांच्या आवडीचे “ Master’s in Coastal Geomorphology” ची पदवी घेतली असून पुण्यातील टिळक कॉलेज येथून “M Ed.” ची पदवी 1994 मध्ये घेतली.तसेच विविध भाषांचे शॉर्ट कोर्सेस ही पूर्ण केले 1992 पासून त्या 30 वर्ष विद्याधानाचे कार्य करत आहेत 2017 पासून मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला असून संस्थेच्या कार्यवाहक संस्थेची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहे. इंद्रायणी यांच्या यशात मोठा वाटा त्यांची आई, वडील ,गुरु ,मुलगा व हितचिंतक यांचा आहे . संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष नुकतेच साजरे झाले.संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान या तीन शाखा असलेली कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाले आहे. त्यामध्ये कला शाखेतही आयटी, फूड सायन्स यासारखे नवीन विषय देण्यात आले आहेत. मोरया शिक्षण संस्थेची स्थापना 1970 मध्ये झाली पण माटे शाळा मात्र त्याआधीच म्हणजे 1966 मध्ये सुरू झाली होती. 1966 मध्ये माटे बाईंच्या घरी बालवाडी चा वर्ग सुरू झाला. इथेच खरी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. 1968 मध्ये चिंचवड मध्ये प्रथमच इंग्रजी बालवाडी सुरू केली.1969 मध्ये श्रीमती पार्वती बाई विद्यालयाची स्थापना झाली. 1982 मध्ये एमएसएस हायस्कूल स्थापन केली. 1993 मध्ये सोलापूर जिल्ह्यातील दहिवली येथे हायस्कूलची सुरुवात केली. 1995 हे संस्थेचे रोप्य महोत्सव वर्ष 2018 मध्ये इंग्लिश मीडियम स्कूलची सुरुवात केली. उत्तम गुणवत्ता पूर्ण शिक्षण एक सुजाण भाविक नागरिक निर्माण करणे हेच कायम संस्थेचे ध्येय राहिले आहे

विद्यार्थी व पालकांसाठी शिक्षणासाठी शिबिरे कार्यशाळा, मार्शल कॅडेट्स प्रशिक्षण, स्काऊट गाईड कब बुलबुल प्रशिक्षण, डिजिटल लर्निंग क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण शाळेत घेतले जाते.सुसज्ज अशी स्टेम लॅब ,विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणारे संस्कृत जर्मन विषय, नाटकांचे तास शाळेत समुपदक्षकाची नियुक्ती स्पेशल इंग्लिश तास शिक्षण असे नानाविध कल्पक उपक्रम राबवले जातात. सुसज्ज ग्रंथालय, पालक विद्यार्थी शिक्षकांसाठी ऑनलाईन पालक कट्टा सारखे व्यासपीठ संस्थेमार्फत राज्यस्तरीय आंतर शालेय मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेचे आयोजन केले जाते. याला दर्जेदार उत्तम प्रतिसाद मिळत आहे. फोकस ठेवून काम केल्यानंतर महिलांना कोणतेही चित्र वर्ज नाही. हे माझ्या आईकडून मला मिळालेले बाळकडू आहे जे प्रत्येक महिला भगिनींसाठी लागू होते. जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिला भगिनींना हार्दिक शुभेच्छा..!!

***पिंपरी चिंचवड मुख्याध्यापक संघातर्फे पिंपरी चिंचवड गुणवत्ता संवर्धन उपक्रम राबवणारी यशस्वी शाळा म्हणून माटे शाळा गौरवली गेली आहे. अशाप्रकारे एका मराठी शाळेला गुणवत्तापूर्ण ग्लोबल करण्याचे ध्येयवादी शिक्षिका ते आदर्श कुशल संस्थाचालक अशी गुणात्मक उत्तम भरारीचा प्रवास चालू आहे.***



# स्त्री म्हणजे वात्सल्य, स्त्री म्हणजे मांगल्य




> ज्याला स्त्री आई म्हणून कळली, तो जिजाऊचा शिवबा झाला
>
> ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली, तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला
>
> ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली, तो राधेचा श्याम झाला
>
> ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली, तो सीतेचा राम झाला...

स्त्री म्हणजे वात्सल्य! स्त्री म्हणजे मांगल्य! स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कणखर कर्तृत्व..

दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन अर्थात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. प्रत्येक महिलेसाठी हा सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. महिलांच्या योगदानाला आणि समाजातील त्यांच्या कर्तृत्वाला आंतरराष्ट्रीय मान्यता देण्यासाठी आणि समाजात त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

भारत असा देश आहे जिथे महिलांना देवी मानले जाते. नवरात्रीमध्ये मुलींची पूजा केली जाते. आपल्या परंपरा आणि सहिष्णुतेमुळे या देशाने जगभरात आपली ओळख निर्माण केली आहे. परंतु खऱ्या अर्थाने आजही आपण महिलांना आवश्यक तो सन्मान देऊ शकलो नाही. न जाणो किती मुली अजूनही शिक्षणाच्या हक्कांपासून दूर आहेत.

मुलींना जन्मापूर्वीच मारले जाते, स्त्री भ्रूणहत्या केली जाते, किंवा त्यांना विकले जाते, त्यांना ओझे मानले जाते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिले तर अजूनही मुली रात्री उशिरापर्यंत घराबाहेर पडू शकत नाहीत. सातच्या आत घरात हा पायंडा फक्त मुलींसाठी पाडला आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेत




शतकानुशतके महिलांना विशेष स्थान आहे. वर्षातून एकदा हा दिवस साजरा करून सन्मान मिळवण्यासाठी पुरेसा आहे का? महिलांचा सन्मान रोज केला असता तर कदाचित हा आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च रोजी साजरा करण्याची वेळच आली नसती. आंतरराष्ट्रीय महिला दिन केवळ एका दिवसासाठी साजरा केल्याने महिलांची स्थिती सुधारणार नाही. त्यांचा विकास होणार नाही.

या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दरवर्षी आपण महिलांना किती आदर दिला आहे? आणि त्यांच्या उन्नतीसाठी किंवा विकासासाठी आपण कोणती पावले उचलली आहेत? यावर अवलोकन होणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने महिलांना समाजात योग्य स्थान दिले जात आहे हे समजू शकेल. त्यासाठी स्वतःपासून, स्वतःच्या घरापासून सुरुवात करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपणा सर्वांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा..!! ♀♀♀



# स्त्री म्हणजे महिलादिन समर्पण, संघर्ष आणि समानतेचा प्रतीक ठरावा!







भावसंवाद
डॉ. अर्चना आहेर
सहाय्यक प्राध्यापक
एम आय टी कला वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय
आळंदी, पुणे.



**जगभरात १९११ पासून दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा उद्देश महिलांच्या संघर्षाची, त्यांच्या योगदानाची आणि सशक्तीकरणाची कदर करणे होय. संघर्षासाठी जन्म घेतलेली प्रत्येक महिला ही समाजाच्या उंच शिखरावर आपला ठसा ठळकपणे उमटवते, तेव्हा तिचा ह्या दिनाचे औचित्य साधून सन्मान केला जातो म्हणून देखील या दिवसाला विशेष महत्त्व आहे. या दिनाचे हेच महत्त्व महिला दिनासाठी प्रतीक ठरावे हीच अपेक्षा आहे.**

आज आम्ही पाहतोय की महिलांनी संघर्ष, समर्पण आणि धैर्याच्या जोरावर किती मोठे बदल घडवलेले आहेत. तरी देखील अजून कितीतरी लढायांचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. “समानता नाही, समर्पण मात्र आहे, प्रत्येक महिलेमध्ये एक महाकाव्य लपले आहे.” म्हणूनच मला वाटते, महिला दिन २०२५ चा प्रसार संदेश “मार्ग समर्पण, संघर्ष आणि समानतेचा” यावर विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आजच्या महिलांचे यश, त्यांच्या वाटचालीतील अडचणी आणि स्वप्नांना गवसणी घालण्याचे त्यांचे ध्येय स्पष्ट होईल.

महिलांचे समर्पण हा समाजाच्या चांगल्या भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांनी जोपासलेली निष्ठा, कर्तव्य आणि धाडस ही त्यांच्या जीवनक्रमात अंगीकारलेली तत्वेच होय.“ महिला म्हणजे जिद्द, समर्पण आणि संकटांना सामोरे जाणारी एक शौर्यगाथा.” समाजातील अनेकविध क्षेत्रांमध्ये महिला व्यस्त असूनही प्रत्येक पातळीवर त्या आपली भूमिका चोख पार पाडत आहेत.

“तिचं जीवन एक संघर्ष, सहजी न दिसणारं बलिदान, तेच तर तिच्या जीवनाचं सार, हसत हसत देते योगदान”

महिलांचा संघर्ष अद्वितीय आहे. प्रत्येक वेळी त्या नवीन आशा व स्वप्न यासोबत नव्या उमेदीने उभ्या राहतात. महिलांनी कुटुंबाच्या सांभाळासाठी, कामाच्या ठिकाणी आणि इतर विविध भूमिकांमध्ये निरंतर संघर्ष केला आहे, करत आहेत. महिलांचे समर्पण हे त्यांच्या कुटुंबाप्रमाणेच समाजासाठीही अतुलनीय आहे. त्यांचा संघर्ष केवळ त्यांच्या स्वतःच्या अधिकारांसाठीच नव्हे तर त्या आपल्या मुली, माता, भगिनी आणि इतर महिलांसाठीही आहे.

परंतु, आजही महिलांना समानतेसाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. लैंगिक वेतन असमानता, घरगुती हिंसा, प्रजनन अधिकारावरील कडक कायदे, शिक्षण व आरोग्य सेवा यावर असलेली मर्यादा इ. सर्व गोष्टी महिला दिनाच्या निमित्ताने मला लक्षात आणून द्याव्याशा वाटतात.

महिलांच्या आवाजाला आजही पुरेसे महत्त्व दिलं जात नाही. विविध चळवळी, सामाजिक आंदोलनं, आणि व्यक्तीगत लढाया या सर्वातून महिलांनी त्यांचे मुद्दे लक्षात आणून देण्याचे प्रयत्न करीत आहेत.

“#MeToo चळवळ, महिला कामकाजी हक्क, समान वेतन आणि सुरक्षिततेसाठी होणारी लढाई ही त्याचेच परिणाम आहेत. हे सर्व मुद्दे महिलांच्या संघर्षाचा परिणाम आहेत आणि आजही महिलांना समाजात समान हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करत राहण्याची प्रेरणा देतात.



या महिला दिनी आपण महिलांसाठी समानतेच्या मार्गाचा विचार करतो आहोत. समानता फक्त कागदावर किंवा कायद्यांतून येणार नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक स्तरीय विचारधारेत, चांगल्या शिक्षणामध्ये, अधिकारांच्या समानतेमध्ये आणि कार्यक्षमतेमध्ये क्रांतिकारी बदलांची आवश्यकता आहे. महिलांसाठी समानतेचा मार्ग म्हणजे प्रत्येक ठिकाणी योग्य संधींचा शोध, कामाच्या ठिकाणी समान वेतन, घरगुती हिंसा निवारण, सामाजिक सुरक्षितता आणि प्रजनन हक्कांचे स्वातंत्र्य होय.

महिलांना समान संधी मिळाल्या तर त्या केवळ आपल्या जीवनाचीच नाही तर संपूर्ण समाजाची दिशा बदलू शकतात. महिलांना मिळालेल्या हक्कांचा पुरेपूर वापर करणे आवश्यक आहे. समाजात सर्व स्त्री-पुरुषांना समान हक्क असावे, असेच एक आदर्श समाजाचे रूप असावे.

“समानतेचा मार्ग म्हणजे प्रत्येक महिलेला तिचे स्वप्न पाहण्याची, ते पूर्ण करण्याची आणि त्यात यशस्वी होण्याची स्वातंत्र्य.”समानतेचा मार्ग हा फक्त एक संकल्पना नाही, तर तो एक वेगळी दिशा दाखवणारा ध्यास आहे.

***प्रत्येक वेळी महिलांसाठी समर्पण, संघर्ष आणि समानतेचा मार्ग नक्कीच कठीण आहे, पण त्यातूनच एक सशक्त, आत्मनिर्भर आणि समान समाज निर्माण होईल.***

***महिलांच्या संघर्षातून जो बदल घडवला जातो, तो समाजाच्या भल्यासाठी असतो. आपल्याला हे लक्षात ठेवून, प्रत्येकाच्या योगदानाची कदर करणारा आणि समानतेला महत्व देणारा समाज निर्माण करण्यासाठी कठोर प्रयत्न करणे आवश्यक आहे. “सशक्त महिला म्हणजे सशक्त समाज, आणि सशक्त समाज म्हणजे एक सशक्त राष्ट्र.” या साध्यतेसाठी एकमेकांच्या सहकार्याने काम करणे गरजेचे आहे.***

***महिला दिन २०२५ च्या निमित्ताने, आपण एक दृढ संकल्प करूया की महिलांना समानतेचे, हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे योग्य स्थान देण्यासाठी आपला सहभाग वाढवू. महिलांचा संघर्ष आणि त्यांच्या विजयाचा सन्मान करण्याची ही सर्वोत्तम वेळ आहे. त्यांच्या या मार्गावर साथ देऊन एक अधिक समतामूलक समाज निर्माण करू या.***

# कर्तृत्व अन् सामर्थ्याची ओढून घे नवी झालर !



## डॉ . श्रेया संजीव दाणी

**दरवर्षी 8 मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आता स्त्रियांमध्ये आपल्या हक्काबाबत सजगता येऊ लागली .आज बऱ्यापैकी स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार झालेला दिसतो . अनेक महत्त्वाच्या पदांवर स्त्रिया कार्यरत आहेत . स्त्रिया विविध सामाजिक ,राजकीय, तसेच धार्मिक विषयांमध्ये सहभागी होऊन आपली मते व्यक्त करताना दिसतात.**

तुझ्या प्रयत्नांना मिळू दे
यशाची सोनेरी किनार
लक्ष लक्ष दिव्यांनी
उजळू दे तुझा संसार
कर्तृत्व अन् सामर्थ्याची ओढून घे नवी झालर
स्त्री शक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर

स्त्री म्हणजे जन्मदाती ...
स्त्री म्हणजे संस्कृती...
स्त्री म्हणजे नाविन्याचा वसा...
स्त्री म्हणजे घराच घरपण...
स्त्री म्हणजे महान कार्य...

आज ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त या स्त्री शक्तीला मानाचा मुजरा....

आजची स्त्री ही कुणापेक्षाही कमी नाही, कोणत्याही कामात ती मागे नाही. चुल आणि मुल सांभाळून ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून स्वतंत्र स्वराज्य निर्माण करुन देण्यासाठी केलेल्या संघर्षाचे दर्शन देणाऱ्या 'राजमाता जिजाऊ', 'मै मेरी झांशी कभी नही दुंगी' असे ठमकावून इंग्रजांशी संघर्ष करणारी 'राणी लक्ष्मीबाई' आणि स्त्री शिक्षणाची महती ओळखून मुलींना, स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करुन देणाऱ्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले', आकाशात भरारी घेणाऱ्या 'कल्पना चावला' यांच्या सारख्या सर्व कर्तृत्ववान



स्त्रियांच्या कार्याला जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने वंदन.... या दिवसाची खरी सुरुवात स्त्रियांच्या सामुहिक प्रयत्नांनी अमेरिकेत 1908 मध्ये झाली.

स्त्री शिक्षणाचा वारसा हाती घेतलेल्या महात्मा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्वत: शिकून वारसा चालविला. सिंधूताई सपकाळ यांनी अनेक अनाथ मुलांच पालकत्व स्विकारुन अनेक मुलांच्या माई बनल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण घेतांना परिक्षा फी भरण्यासाठी त्यांच्या पत्नी रमाबाई यांनी कष्ट करुन पैसे कमविले, अशी अनेक उदाहरणे पुरुषांच्या यशामागे स्त्रीयांचा वाटा दर्शवितात. आपल्या इतिहासात 'हिरकणी' सारखी एक आई होऊन गेली, जी स्वत:च्या बाळाच्या प्रेमापोटी रायगडाचा उभा कडा उतरुन आली. 'झाशीची राणी' होऊन गेली जी बाळ पाठीवर बांधून लढली, त्यावरुन स्त्री एक अगाध शक्तीचे रुप आहे हे समजते.

अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ जगभराच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण. या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्यापरीने संघर्ष करीत होत्या. त्यामध्ये 'क्लारा झेटकिन' या कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे अशी घोषणा केली. 8 मार्च 1908 मध्ये न्युयॉर्कमधील कपडयाच्या कारखान्यात काम करत असलेल्या महिलांना काम जास्त पण मजुरी कमी मिळायची या कारणामुळे त्यांनी लढा पुरकारला, दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता तसेच मतदानाचा हक्क मिळावा, अशा मागण्याही जोरकसपणे केल्या. स्त्रियांनी संघटित होऊन स्वत:चा अधिकार मागण्यासाठी केलेला हा संघर्ष जगाच्या इतिहासातील पहिला संघर्ष मानला जातो. 8 मार्च 1908 या दिवसाला ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ 'जागतिक महिला दिन' म्हणून स्विकारावा, असा जो ठराव मांडला तो पास होऊन त्याला मान्यता मिळाली. आपल्या भारत देशात 8 मार्च 1943 रोजी मुंबई येथे पहिल्यांदा महिला दिवस साजरा करण्यात आला.

आजही खरचं स्त्री स्वतंत्र झाली आहे का ? हा प्रश्न समाजमनाला अंतर्मुख होण्यास भाग पाडतो हेही तितकेच खरे आहे. महिलांवर अबला म्हणून अत्याचार करणारे कधी सुधारतील? आजही समाजात स्त्री असुरक्षित आहे. लैंगिक शोषण, अत्याचार या गोष्टीमुळे स्त्रीयांचे, मुलींचे जीवन धोक्यात येत आहे. आज ही समाजात मुलींना जन्म देतांना विचार केला जातो. मुलींचा तिरस्कार केला जातो. असा अत्याचार करणाऱ्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की ती महिला कुणाची तरी आई, बहिण किंवा मुलगीचं आहे. स्त्री-पुरुष समानता ही समाजात आचरणात आणायला हवी. प्रत्येक स्त्री ही समाजता स्वत:ची ओळख निर्माण करीत आहे. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. आपण अशा स्त्रियांना प्रोत्साहन दिले पाहिजे. कुंटुंबातील केवळ निर्णय तिच्यावर थोपविण्याऐवजी निर्णय घेण्यात तिला सुद्धा सामिल करुन घ्यायला हवे. स्त्री सन्मानाची सुरुवात आपल्या घरापासून करायला हवी. तरचं आपला भारत देश सुरक्षित, सक्षम आणि बलवान होईल.



# 'ती' तर धगधगता अंगार आहे !

## आंतरराष्ट्रीय महिला दिन

> काळानुरूप समाजामध्ये बदल झालेला आहे . आज स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसते . अंतराळ संशोधन, वैमानिक, रेल्वे वाहक चालक, शिक्षक ,प्राध्यापक, वकील ,डॉक्टर अशी सर्व क्षेत्रे आज महिलांनी व्यापलेली आहेत.





भावसंवाद
शुभांगी विक्रांत लांडे
विश्वस्त, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ




वार नाही तलवार आहे
ती समशेरीची धार आहे
स्त्री म्हणजे अबला नाही
ती तर धगधगता अंगार आहे ॥

8 मार्च हा दिवस सर्व जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो .आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !. आज 21 व्या शतकात वाटचाल करताना स्त्रियांच्या कामगिरीचा दर्जा निश्चितच उंचावलेला आहे .प्राचीन काळातील स्त्रिया सुक्तकर्त्या होत्या . त्यामध्ये गार्गी, मैत्रयी, विश्वतारा, अपाला यांचा समावेश होता .प्राचीन काळात स्त्रियांना आपला वर निवडण्याचा सुद्धा अधिकार होता . परंतु कालांतराने स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला . "रांधा वाढा उष्टी काढा" या चौकटीत स्त्रीला बंदिस्त केले गेले .परंतु आधुनिक काळात सावित्रीबाई फुले या पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका झाल्या आणि त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षण हे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शकेल, हा विचार सावित्रीबाईंचा होता. स्त्री पुरुष समानतेचा संदेश त्यांनी जगाला दिला .



काळानुरूप समाजामध्ये बदल झालेला आहे . आज स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसते . अंतराळ संशोधन, वैमानिक, रेल्वे वाहक चालक ,शिक्षक ,प्राध्यापक, वकील ,डॉक्टर अशी सर्व क्षेत्रे आज महिलांनी व्यापलेली आहेत. सर्वच क्षेत्रात महिलांचा उज्वल ठसा उमटलेला दिसतो. 19 व्या शतकात जगभरातील स्त्रीवादी चळवळीने जोर धरला. भारतातही राजा राममोहन रॉय, महर्षी कर्वे ,महात्मा ज्योतिबा फुले ,सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे यांनी स्त्रियांच्या संदर्भातील केलेले कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते .

स्वातंत्र्यानंतर 1950 सालापासून भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना समानतेचा अधिकार दिला आहे. संयुक्त राष्ट्रांनी सन 1975 हे जागतिक महिला वर्ष घोषित केले आहे . 8 मार्च हा महिला दिन जगभरात आणि भारतातही साजरा केला जातो . स्त्रियांना मान सन्मान, समानतेची वागणूक मिळावी हीच अपेक्षा !

# “सशक्त महिला, सक्षम समाज”



## आंतरराष्ट्रीय महिला दिन

**“सशक्त महिला, सक्षम समाज” ही संकल्पना पुढे नेत, सर्व स्तरांवरील आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांचे योगदान समजून घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे हा उद्देश महिला दिवसाच्या निमित्ताने केला पाहिजे. दरवर्षी ८ मार्च रोजी संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महिलांच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या तसेच विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. आजच्या आधुनिक जगात, महिलांनी प्रत्येक स्तरावर स्वतःचा ठसा उमटवला आहे – मग ते शिक्षण असो, अर्थव्यवस्था असो, समाजसेवा असो किंवा विज्ञान-तंत्रज्ञान असो.**



भावसंवाद
- प्रा. डॉ. सायली गणकर,
कुलगुरु, डी वाय पाटिल विद्यापीठ, पुणे-अंबी.

महिलांचे सर्व स्तरांवरील योगदान हे आपण समजून घेतले पाहिजे. शिक्षण आणि संशोधन पूर्वी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या महिलांनी आज शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी मजल मारली आहे. डॉक्टर, वैज्ञानिक, अभियंते, प्राध्यापक, संशोधक अशा विविध भूमिका बजावत आज महिला समाजाचा कणा बनल्या आहेत. सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, ॲनी बेझंट, कमलादेवी चटोपाधय, सुनीता नारायण, यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली ती सतत वाढवली आणि आज अनेक महिलांना आपल्या उदाहरणावरून शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावतांना प्रोत्साहित केले.



### राजकारण आणि समाजसेवा

महिलांनी राजकीय क्षेत्रातही मोठी प्रगती केली आहे. भारतात इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, द्रौपदी मुर्मू, निर्मला सीतारामन, सुषमा स्वराज यांसारख्या अनेक महिलांनी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. गावपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही महिलांचा प्रभाव वाढत आहे.

### अर्थव्यवस्था आणि उद्योजकता

महिला आज मोठ्या प्रमाणावर उद्योगजगत आणि स्टार्टअप क्षेत्रात उतरल्या आहेत. फाल्गुनी नायर (Nykaa), किरण मुझुमदार-शॉ (Biocon), विनीता सिंग (Sugar Cosmetics) यांसारख्या महिलांनी व्यवसाय क्षेत्रात नाव कमावले आहे. त्याचबरोबर लघुउद्योग आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून असंख्य महिला आर्थिक स्वायत्तता मिळवत आहेत.

### महिला शास्त्रज्ञ आणि संशोधक , तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांचे योगदान

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ही वाढता प्रभाव जाणवत आहे सायंटिफिक रिसर्च, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांत महिलांची संख्या वाढत आहे. भारतात कल्पना चावला, टेसी थॉमस (मिसाईल वुमन ऑफ इंडिया), डॉ रितु करिधाल, डॉ रोहिणी गोडबोले झालं यांसारख्या महिलांनी विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ISRO, DRDO, NASA यांसारख्या संस्थांमध्ये महिलांचे योगदान लक्षणीय आहे.

### सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञान स्टार्टअप्स

अनेक महिलांनी तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्स सुरू करून भारताच्या डिजिटल क्रांतीत मोठी भूमिका बजावली आहे. डॉ मनिषा अग्रवाल, डॉक्टर मंगला नांबियार ऋषिका चक्रवर्ती (Project Nandini), अपूर्वा मेहता (Instacart) यांसारख्या महिला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नावाजलेल्या आहेत. डिजिटल युगात सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), बिग डेटा यांसारख्या क्षेत्रांत महिलांची उपस्थिती लक्षणीय वाढली आहे. अनेक महिला एथिकल हॅकर्स, डेटा सायंटिस्ट्स आणि तंत्रज्ञान सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

### भारतीय संविधानातील महिलांचे योगदान

भारताच्या संविधान निर्मितीत महिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वतंत्र भारताच्या घटनेच्या मसुदा समितीत काही प्रभावी महिला होत्या, ज्यांनी स्त्रियांच्या समानतेच्या तत्त्वांवर आणि हक्कांचे रक्षण करण्यासाठी महत्वपूर्ण मते मांडली.

संविधान निर्मितीत योगदान दिलेल्या प्रमुख महिला डॉ. हंसा मेहता या शिक्षणतज्ज्ञ आणि महिला हक्कांसाठी लढणाऱ्या एक नामांकित कार्यकर्त्या होत्या. दुर्गाबाई देशमुखा सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षणतज्ज्ञ आणि घटनेच्या मसुदा समितीच्या सदस्य, राजकुमारी अमृत कौर भारताच्या पहिल्या आरोग्य मंत्री होत्या. त्यांनी AIIMS (All India Institute of Medical Sciences) ची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला. सरोजिनी नायडू भारतीय संविधानात महिलांच्या राजकीय सहभागाची संकल्पना त्यांनी मांडली. त्या भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. विजया लक्ष्मी पंडित त्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या. आजही प्रत्येक क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देत आहेत. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांची उपस्थिती दिवसेंदिवस वाढत असून त्यांनी सिद्ध केले आहे की कोणतेही क्षेत्र त्यांच्यासाठी कठीण नाही. त्यामुळे महिला दिन हा महिलांच्या कर्तृत्वाचा आणि योगदानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. त्यांनी मोठ्या जिद्दीने आणि मेहनतीने सर्व अडथळ्यांवर मात केली आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. “आजची महिला ही संधी निर्माण करणारी , कर्तृत्ववान आणि सशक्त आहे !”

# महिलांना आरोग्यदृष्ट्या सक्षम बनविण्याचा वसा!

## महिलांना स्वतःच्या आरोग्यविषयी जागरूक करण्याचे काम

**अनेक वर्षांपासून रुग्णसेवेत रमलेल्या डॉ. कांचन वायकुळे . पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य सेवेत कार्यरत आहेत. महिलांना आरोग्यदृष्ट्या सक्षम बनविण्याचे ध्येय साध्य करताना, महिलांना स्वतःच्या आरोग्य विषयी जागरूक करण्याचे काम डॉ. कांचन अगदी मनापासून करत आहे.**





भावसंवाद

डॉ. कांचन वायकुळे

वरिष्ठ शल्यचिकित्सक, पिंपरी चिंचवड महापालिका

गेल्या डॉ. कांचन वायकुळे सांगतात मी २००५ मध्ये माझे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. ग्वाल्हेर मेडिकल कॉलेजला एमबीबीएस पदवी घेतली. एमबीबीएसनंतर पुढे एमएस म्हणजेच शल्यचिकित्सकाची पदवी घेतली.मेरिटमध्ये आल्यानंतर जेव्हा मला शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली होती. यानंतर जहांगीर हॉस्पिटलमध्ये अंको सर्जन सी.बी. कोपीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रॅक्टिस सुरू केली, कॅन्सर सर्जरी शिकले. याचा फायदा आता होत आहे. २०१२ मध्ये वायसीएम रुग्णालयात रुजू झाले . आत्ता महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात महिला सर्जन म्हणून काम करत आहे. तसेच, लॅप्रोस्कोपी हाताळत आहे असे डॉ. कांचन सांगतात.

डॉ. कांचन सांगतात, वायसीएम रुग्णालयात वरिष्ठ शल्यचिकित्सक म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळत असताना अनेक संघर्षांचा सामना केला आहे.अनेक चॅलेंजिंग रुग्ण हाताळले आहेत. वायसीएम रुग्णालयात दाखल झालेल्या तळवडे येथील 26 वर्षीय महिलेच्या पोटात साडेतीन किलोचा डेसमॉइड ट्यूमर होता. हा ट्युमर माझ्या देखरेखीखाली यशस्वी शस्त्रक्रिया करून काढून टाकण्यात आला. दुसरा अशीच केस होती . वायसीएम रुग्णालयात एक गरोदर महिला आपत्तकालीन परिस्थतीत दाखल झाली होती. तिच्या पोटात गाईने शिंग मारले होते . त्यामुळे आतडे बाहेर पडले . आम्ही सर्जरी केली. त्यावेळी महिलेचा सातवा महिना साधारण सुरु होता. बाळाला धक्का न लावता नऊ महिन्यानंतर बाळंतपण केले.

यामुळे वायसीएममध्ये अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया होतात. हे लोकांना या माध्यमातून समजले. या निमित्ताने माझा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात सत्कार देखील करण्यात आला.

डॉ . कांचन सांगतात की प्रॅक्टिस करत असताना लक्षात आले की महिलांमध्ये आरोग्यविषयक जनजागृतीची कमतरता आहे. त्यामुळे कॅन्सर सारख्या आजाराबाबत गुंतागुंत झालेली पाहायला मिळते. कॅन्सरसारख्या आजारात खूप सारे गैरसमज देखील करून घेतलेले असतात. त्यामुळे महिला उपचार घेताना टाळाटाळ करतात. त्यामुळे आम्ही जनजागृती करण्यावर भर देतो. ग्रामीण भागात याचा प्रचार आणि प्रसार आता करत आहे. बऱ्याचदा महिला संकोचामुळे दवाखान्यात जाणे टाळतात. यासाठी " clinic by the women's for the women's " ही संकल्पना मी पुढे आणली आहे. या क्लिनिकमध्ये स्त्रियांना आपला आजार आपले दुखणे सांगायला संकोच वाटणार नाही. डॉ. कांचन यांनी Laser Proctology Training Course पूर्ण केलाअसून, त्याद्वारे रुग्णांची दुर्बिणीद्वारे अत्याधुनिक पद्धतीने शस्त्रक्रिया करतात. सध्या, त्या लॅप्रोस्कोपी आणि रोबोटिक शस्त्रक्रिया तंत्रांवर लक्ष केंद्रित करून, AWR.मध्ये फेलोशिप घेत आहे. आजवर अनेक महत्त्वाच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे

आई-वडिलांकडून मिळालेली भक्कम साथ, लग्नानंतर कुटुंबातून मिळालेला पाठिंबा, पती डॉ पंकज, मुली मान्या आणि मुदिता यांच्याकडून मिळालेले प्रोत्साहन यामुळे वैद्यकीय क्षेत्रात अतिशय चांगल्या प्रकारे काम करता येत आहे असे डॉ. कांचन सांगतात. भविष्यात दुर्गम अशा छोट्या छोट्या खेड्यांमध्ये क्लिनिक सुरु तेथील महिलांना मोफत आणि जास्तीत जास्त उपचार करायचे असे डॉ कांचन यांचे स्वप्न आहे.

